दिवाणी दावा क्र.३४१/२०१६
निशाणी क्र. ६५

## निशाणी क्र.६५ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'पुरावा बंदचा आदेश' रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. प्रस्तूत अर्जावर वादींचे म्हणणे मागविले. त्यावर वादींनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ते न्यायालयात हजर राहू शकले नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या विरुध्द 'पुरावा बंदचा आदेश' पारीत झाला. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द झालेला 'पुरावा बंदचा आदेश' रद्द करण्यात यावा.

३. वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद के की, प्रतिवादींना बरीच संधी देऊन पुरावा बंद केला आहे. तरी विनंती की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद लक्षात घेता, प्रत्येक अर्जात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक

न्यायतत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची  बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांच्या विरुध्द झालेला ‘पुरावा बंदचा आदेश’ रद्द करण्यात येतो.

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2022.07.05 17:18:28 +0530

औसा (पी.डी. कोळेकर)

दिनांकः– ०५/०७/२०२२ सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, औसा